## रे.दि.मु.नं. ३०३/२०२० मधील नि.१६ खालील आदेश

CNR No.MHSO20-002266-2020

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, वादीच्या दावा कलम १ यात वर्णन केलेल्या शहर सांगोला येथील सर्वे नं.२९५/८, क्षेत्र ७हे–२२आर, पो.ख. ०हे–१९आर यापैकी ४हे–७६आर, पो.ख. ०हे–१०आर या मिळकतीच्या अनुशंगाने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. शहर सांगोला येथील सर्वे नं.२९५/८ क्षेत्र ८ एकर ३६ गुंठे, पो.ख. ०हे–१०गुंठे ही मिळकत तात्या आप्पा ऐवळे यांचे मालकी वहिवाटीची होती. यातील वादींचे पुर्वाधिकारी म्हणजेच वादी क्र.१ ते ४ यांचे वडील माधव गोपाळ भोसले यांनी सदरहु मिळकत तात्या आप्पा ऐवळे यांचेकडुन दि.२२/१०/१९५१ रोजी कायमखुष खरेदी घेतली. त्याप्रमाणे सदर मिळकतीचे हक्कपत्रकी खरेदी घेणार म्हणुन माधव गोपाळ भोसले यांचे नावाची नोंद प्रमाणित करण्यात आली. पुढे दि.२८/०५/१९५२ रोजी माधव गोपाळ भोसले यांनी वर नमुद केलेल्या क्षेत्रापैकी १/२ क्षेत्रफळाची मिळकत यातील प्रतिवादींचे पुर्वाधिकारी विठोबा गोपाळ भोसले यांचे नावाने खरेदीखत अस्तित्वात आणले. पुढे यातील वादींच्या पुर्वाधिका–यांची सर्वे नं.२९५/८ पैकी मारुती हरी सावंत यांचा असलेला समाईकातील १/६ हिस्सा दि. २०/०८/१९६२ रोजीचे कायमखुष खरेदी दस्ताने खरेदी घेतली.

३. जरी यातील वादीचे पुर्वाधिका–यांनी विठोबा गोपाळ भोसले यांचे नावे खरेदीखत लिहुन दिले असले तरी देखील सदर मिळकतीचे आजतागायत कधीही सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते. विठोबा गोपाळ भोसले हे कायमस्वरुपी पायाप्पाचीवाडी, ता. मिरज येथे वास्तव्य करुन होते. त्यांनी कधीही खरेदी घेतलेल्या क्षेत्रफाळात वहिवाट केली नव्हती व नाही. किंबहुना यातील वादींच्या पुर्वाधिका–यांनी विठोबा गोपाळ भोसले यांना कधीही खरेदी मिळकत वहीवाटण्यास दिलेली नव्हती व नाही. वादींच्या पुर्वाधिका–यांनी त्यांच्या हयातीत व त्यांचे पश्चात हल्लीचे वादींनी विठोबा गोपाळ भोसले व त्यांचे पश्चात त्यांचे

वारसांचे देखील मालकी हक्क नाकारुन वाद मिळकत वहिवाटलेली होती. अशाप्रकारे सुमारे ६० वर्षापासुन प्रस्तुत वादाचा विषय असलेली मिळकत वादी व त्यांचे पुर्वी त्यांचे पुर्वाधिका–यांचेच कब्जे वहिवाटीस होती व आहे. त्यामुळेच वादींनी प्रस्तुतचा विरुध्द कब्जाने झाले असलेबाबतचा हक्कशाबीतीचा दावा दाखल केला आहे.

४. प्रस्तुत दाव्याचे कामकाज प्रलंबित आहे याची यातील प्रतिवादींना प्रथमपासुन माहिती होती व आहे. मात्र यातील वादींना होणा–या संभावित हुकुमनाम्याची फळे चाखता येऊ नयेत त्याकामी विनाकारण विघ्न उत्पन्न व्हावेत या गैरहेतुने यातील प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी जाणुन बुजून दि.१०/११/२०२० रोजी वाद मिळकत सर्वे नं.२९५/८ पैकी क्षेत्र संतोष बिरा मेटकरी व विश्वनाथ नवनाथ चांडोले यांचे नावाने एक अभाशी असा खरेदीखत म्हणविणारा दस्त अस्तित्वात आणलेला आहे. दावा सुरु असताना प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी संगनमताने अस्तित्वात आणलेला खरेदीखताचा दस्त हा मुलतः रद्दबालत व बेकायदेशीर आहे.

५. मात्र या वादींचे नावाने होणारे संभावीत हुकुमनाम्याचे अंमलबजावणी कामी सदरहु इसमांनी भविष्यात अडथळे निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांच्या उपस्थितीशिवाय वादीने नावे होणारा संभावित हुकुमनामा याची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी सदरहु बेकायदेशीर खरेदीदारांना याकामी सामील पक्षकार करुन घेणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. सदरच्या अर्जावर प्रतिवादी तर्फे म्हणणे दिले की, अर्ज खरा व कायदेशीर नाही. संतोष बिरा मिटकेरी व विश्वनाथ नवनाथ चांडोले यांनी कायदेशीर मालक व वहीवाटदार यांच्याकडून दि.१९/०९/२०२० रोजी खरेदी घेतली आहे. सदर खरेदीदार यांना या दाव्यात पार्टी करणेची कायद्याने आवश्यकता नसल्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

७. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, सदर अर्जावर तारीख नमूद नाही. सदरचा अर्ज कोणी मा. कोर्टात दिला हेही समजून येत नाही. त्यावर वकीलांची सही नाही त्यामुळे अर्ज रद्द करणेत यावा.

८. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकला. वादीने दाव्याची लिस पेंडन्सी नोंद मिळकत हस्तांतरण कायदा १८८२ चे कलम ५२ अन्वये दुय्यम निबंधक सांगोला यांच्याकडे नोंदविलेबाबत वादी किंवा प्रतिवादींचे कथन नाही. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दि.१०/११/२०२० रोजी सर्वे नं.२९५/८ पैकी काही क्षेत्र संतोष बिरा मेटकरी व विश्वनाथ नवनाथ चांडोले यांना खरेदी दिल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा दावा हा जाहीर होऊन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. सर्वे नं.२९५/८ पैकी काही मिळकत दाव्याचा विषय आहे. दावा हा एकतर्फा सुनावणीसाठी प्रलंबित आहे. या सर्व परिस्थितीवरुन प्रस्तुत प्रस्तावित प्रतिवादींना दाव्यात समाविष्ठ करुन घेणे आवश्यक आहे. खरेदीदारांना दाव्यात समाविष्ठ न केल्यास त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणार नाही. त्यामुळे खरेदीदारास दाव्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. परंतु अर्जातील मागणी पाहता वादीने केवळ सरनाम्यात दुरुस्ती करुन प्रतिवादी सामिल करण्यासाठी अर्ज दिल्याचे दिसून येते. त्याबाबत दाव्यातील मजकूर नमूद करण्याबाबत अर्जामध्ये कथन केलेले नाही. प्रस्तावित प्रतिवादींच्या विरुध्द अर्जातील कथन दाव्यामध्ये सामिल न करता तसेच प्रस्तावित प्रतिवादींच्या विरुध्द मागणी न करता केवळ सरनाम्यात त्यांचे नाव दाखल करणे आवश्यक व न्याय्य नाही. अर्जातील मागणी परिपूर्ण नाही. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

अर्ज नि. १६ नामंजूर करण्यात येतो.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2021.12.10 17:59:49 +0530

दिनांक – ०८/१२/२०२१

( सौ. एस. के. देशमुख )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh, Jt. Civil Judge, J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 10.12.2021 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 10.12.2021 |